# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 15/04/2023 (शनिवार) सकाळ

---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई
### वाहनासह एकुण ५०४८०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत येणाऱ्या ०४ कि.मी. अंतरावर गांगापुर जवळील पुलावजळ येथे दिनांक १४/०४/२०२३ चे ०१/०० वा. ते ०१/१० वा. दरम्यान जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, गांगापुर पुलाजवळ ट्रकच्या साहाय्याने अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण येथील स्टाफने घटनास्थळी जावुन वाहन थांबवुन चेक केले असता १) ट्रक क्र. एम एच .—३६ ए ए —३०२८ अशोक ले लॅन्ड १० चक्का मध्ये चालक **आरोपी नामे— सतिश बाळकृष्ण बोरीकर वय २६ वर्ष रा नवेगाव पवणी जि भंडारा** २) ट्रक क्र एम एच—३६ ए ए —२२९६ टाटा कंपनीचा १० चक्का चा चालक **आरोपी नामे— मोहन शंकर हटवार, वय २६ वर्ष, रा. आसगाव ता. पवनी जि. भंडारा** यांनी आपापल्या ताब्यातील ट्रकमध्ये विनापरवाना (रॉयल्टी) रेतीची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातुन १) १२ ब्रास रेती किंमती अंदाजे ४८,०००/— रू. २) ट्रक क्र. एम एच ३६ ए ए ३०२८ अशोक ले लॅन्ड १० चक्का किंमती अंदाजे २५,००,०००/—रू. व ट्रक क्र. एम एच ३६ ए ए— २२९६ टाटा कंपनीचा १० चक्का किंमती अंदाजे २५,००,०००/—रू. असा एकुण वाहनासह किंमती अंदाजे ५०४८०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोहवा ८११ मंगेश नरेंद्रराव काळे वाहतुक शाखा नाग्रा. नागपुर यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि पांडे मो. नं. ९७६३७०७९८४ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक श्री. विजय माहुलकर यांचे नेतृत्वात पोलीस हवालदार मंगेश काळे, विजय तायडे चालक पोलीस हवालदार गुरूचरणसिंग जब्बल यांनी यशस्वीरित्या पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर